महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४२१
ई-मेल-foreignscholarship.desk18@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

## जाहिरातीचा मसुदा

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत महाराष्ट्र राज्यातील **"खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या गुणवंत मुलामुलींना परदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती"** ज्या गुणवंत विद्यार्थ्यांनी सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात पदव्युत्तर पदविका व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी QS (Quacquarelli Symonds) World Ranking २०० च्या आत असलेल्या शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतला असेल, अशा विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. या करीता सदर योजनेंतर्गत पात्र उमेदवारांकडून शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी online पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या शिष्यवृत्तीसाठी खालीलप्रमाणे शाखा/अभ्यासक्रमनिहाय जागा उपलब्ध आहेत.

| अ.क्र. | शाखा/अभ्यासक्रम | पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका |
|---|---|---|
| १ | कला | ०३ |
| २ | वाणिज्य | ०३ |
| ३ | विज्ञान | ०५ |
| ४ | व्यवस्थापन | ०४ |
| ५ | विधी अभ्यासक्रम | ०३ |
| ६ | अभियांत्रिकी/तंत्रज्ञान | १५ |
| ७ | वास्तूशास्त्र | ०३ |
| ८ | औषधनिर्माण शास्त्र | ०४ |
| | | ४० |

**सदर शिष्यवृत्तीसाठी पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत.**

१. उमेदवार व उमेदवाराचे आई/ वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावेत.

२. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेश घेतलेल्या व प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे अद्ययावत (सन २०२६ मधील) QS (Quacquarelli Symonds) World Ranking २०० च्या आत असणे बंधनकारक आहे.

३. उमेदवाराच्या पालकांचे/कुटुंबाचे व उमेदवार नोकरी करीत असल्यास त्याचे स्वत:चे उत्पन्न धरुन सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील एकत्रित कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखांपेक्षा जास्त नसावे.

४. या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, अनुज्ञेय लाभ, निवड कार्यपध्दती, व या कार्यक्रमाचे वेळापत्रक इत्यादी माहितीकरीता तंत्र शिक्षण संचालनालयाच्या **https://dte-fs.trti-maha.in:82** व **https://fs.maharashtra.gov.in** या संकेतस्थळास भेट द्यावी.

५. **ही योजना फक्त खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या विद्यार्थ्यांकरीता लागू राहील. ज्या मागास प्रवर्गाच्या किंवा अन्य विविध प्रवर्गासाठीच्या/ अल्पसंख्यांक समुदायाच्या परदेशी शिष्यवृत्तीसाठी योजना विद्यार्थ्यांना /उमेदवारांना लागू करण्यात आलेल्या आहेत त्या त्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी/**

उमेदवारांनी त्या त्या योजनांमधून अर्ज करणे अनिवार्य आहे. त्यामुळे अन्य प्रशासनिक विभागाच्या परदेशी शिष्यवृत्तीच्या योजनेसाठी अर्ज करण्यास पात्र असलेले विविध प्रवर्गातील व अल्पसंख्यांक समुदायातील विद्यार्थी वगळून इतर सर्व उमेदवार/विद्यार्थी या योजनेसाठी खुल्या प्रवर्गाचे उमेदवार/विद्यार्थी पात्र समजण्यात येतील.

६. या योजनेकरीता पीएच.डी अभ्यासक्रमाचे अर्ज प्राप्त झाल्यास, अश्या विद्यार्थ्यांना प्रायोजकत्व (Sponsorship) न मिळाल्याची खात्री करून त्यांचा विचार करण्यात येईल.

७. **इच्छुक उमेदवारांनी [https://dte-fs.trti-maha.in:82](https://dte-fs.trti-maha.in:82) व [https://fs.maharashtra.gov.in](https://fs.maharashtra.gov.in) या संकेतस्थळावर online पध्दतीने अर्ज भरावा व online भरलेल्या अर्जाची प्रत, मुळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे** यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी संबंधित विभागीय कार्यालयात खालील वेळापत्रकानुसार सादर करावीत.

| अ.क्र. | कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | संकेतस्थळावर Online पध्दतीने अर्ज भरणे व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रे अर्जासोबत अपलोड करणे | १६ जून २०२६ ते १६ जुलै २०२६ |
| २ | उमेदवारांनी खालीलप्रमाणे शाखा /अभ्यासक्रमनिहाय Online भरलेल्या अर्जाची प्रत, मुळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह विभागीय कार्यालयात पडताळणीसाठी अर्ज सादर करण्याची मुदत<br><br>१. कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमांसाठी ज्या उमेदवारांनी अर्ज केला आहे व उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्यातील संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, उच्च शिक्षण या ठिकाणी<br>२. व्यवस्थापन, अभियांत्रिकी / वास्तूकलाशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी ज्या उमेदवारांनी अर्ज केला आहे, त्यांनी उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्यातील संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, तंत्र शिक्षण या ठिकाणी | १७ जून २०२६ ते १७ जुलै २०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |

उच्च शिक्षण विभागीय कार्यालये व तंत्र शिक्षण विभागीय कार्यालयांची पत्तानिहाय माहिती वरील संकेतस्थळावरील माहिती पुस्तिकेमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**Online अर्जाव्यतिरीक्त इतर कोणत्याही पध्दतीने अर्ज केलेले अर्ज विचारांत घेतले जाणार नाहीत.** इच्छुक उमेदवारांनी निर्धारित कालावधीत वरीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे व त्यांनतर सदर अर्जदारांना याबाबतची सर्व माहिती/सूचना उपरोक्त संकेतस्थळावरुनच देण्यात येतील त्यानुसार त्यांनी कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

स्वा /-
(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक
तंत्र शिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई